0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २८/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेले अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा.२७७, दिनांक ३०/०३/२०१३, १५/०४/२०१३ व ०३/०५/२०१३.

३) टँकर क्रमांक एमएच-०४-डीके-७६८९ मधील साठा हा साठा मालकांस बंधपत्र घेऊन परत करण्याबाबतचे दिनांक ०६/०५/२०१३ रोजी पारीत करण्यात आलेले अंतरीम आदेश.

४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १५८६/२०१३, १५८७/२०१३ व १८३१/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी पारीत केलेले आदेश.

५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३२/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी पारीत केलेले आदेश.

६) या कार्यालयाचे दिनांक ०९/०७/२०१३ रोजी पारीत करण्यात आलेले अंतरीम आदेश.

७) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३९/२०१३, १८४०/२०१३ व १८४१/२०१३ अन्वये दिनांक २२/०७/२०१३ रोजी पारीत केलेले आदेश.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२७/२०१३/जा. ७६७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० २०.
दिनांक : १२/०८/२०१३.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २०/०३/२०१३ रोजी या कार्यालयास सेक्टर १९ अे, गाडी अड्डा, वाशी येथे टँकरमधून विविध प्रकारच्या ऑईलची अवैधरित्या खरेदी, विक्री व चोरी केली जात असल्याबाबत मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी तसेच उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह धाड टाकुन घटनास्थळी काही इसम उभ्या असलेल्या टँकरमधील द्रवपदार्थाचा साठा हा टँकरच्या डाव्या बाजूस असलेल्या वॉल्वमधून पाईपच्या सहाय्याने पत्र्याच्या डब्यात गैरमार्गाने काढत असल्याचे पथकास आढळुन आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर

घटनास्थळी असलेले टँकर क्रमांक एमएच-०४-इएल-३१११, एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-सीजी-४३१९, एमएच-४३-यू-४८५८, एमएच-०४-ईबी-५९८८, एमएच-०४-ईबी-५०४८, एमएच-४३-ई-९५९४, एमएच-०६-ऐसी-१५७४, एमएच-०४-बीयू-६३३४ व एमएच-४६-एफ-३७५३ असे एकूण १० टँकर तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळावरील परिसरात गैरमार्गाने टँकरमधील काढण्यात आलेला लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा व टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ मधील द्रवपदार्थाचा साठा हा जागीच जप्त करुन संबंधिताविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०४/२०१३, ३०/०४/२०१३ व २९/०५/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली. तद्नंतर घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या विविध साठयातील घेण्यात आलेल्या नमुन्यांचा पृथःकरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०९/०४/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपींचा, ट्रक चालकांचा तसेच माल धारकांचा तपास चालु असुन गुन्हयाचा तपास प्राथमिक टप्प्यात असल्याने गुन्हयाचा अहवाल सादर करण्याकरीता पुढील तारीख मिळण्याची विनंती केली.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०४/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात, नोटीसमधील प्रतीवादी अनु.क्र. १, २, ३ व २९ यांचा शोध घेतला परंतु ते मिळुन न आल्याने त्यांना नोटीसची बजावणी करता आली नाही. सदर प्रतीवादींचा शोध घेऊन त्यांना नोटीस बजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सदर नोटीस बजावणी झाल्यास त्याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करण्यात येईल असे नमुद आहे व ३०/०५/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी बाबत तपास करण्यात येत आहे असे नमुद आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणी अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

दिनांक २०/०३/२०१३ रोजी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने सेक्टर १९ अे, गाडी अड्डा, वाशी येथे पंचांसह धाड टाकुन घटनास्थळी १० टँकर तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळावरील परिसरात गैरमार्गाने टँकरमधील काढण्यात आलेला लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा व टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ मधील द्रवपदार्थाचा साठा हा जागीच जप्त करुन संबधिताविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १५८६/२०१३, १५८७/२०१३ व १८३१/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी, क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३२/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी व क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३९/२०१३, १८४०/२०१३ व १८४१/२०१३ अन्वये दिनांक २२/०७/२०१३ रोजी टँकर क्रमांक एमएच-०४-इएल-३१११, एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-ईबी-५९८८, एमएच-०४-ईबी-५०४८, एमएच-४३-ई-९५९४, एमएच-०६-अेसी-१५७४, एमएच-०४-बीयू-६३३४ व एमएच-४६-एफ-३७५३ असे एकुण ८ टँकर मुक्त करण्याचे आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सुचना यापुर्वीच देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी वरील नमुद ८ टँकर हे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी यापुर्वीच मुक्त करण्याचे आदेश पारीत केले असल्याने सदरचे ८ टँकर वगळता घटनास्थळी जप्त करण्यात आलेले उर्वरीत दोन टँकरबाबत आदेश पारीत करण्याचे प्रस्तावित आहे. सबब, टँकर क्रमांक एमएच-०४-सीजी-४३१९ हा त्यामधील साठयासह व एमएच-४३-यू-४८५८ हे दोन्ही टँकर मुक्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील पथकाने धाड टाकली असता, घटनास्थळावरील परिसरात टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ हे बेवारस स्थितीमध्ये उभे असल्याचे आढळुन आले. पथकाने टेंम्पोची पहाणी केली असता सदर टेंम्पोमध्ये विविध टँकरमधुन गैरमार्गाने काढण्यात आलेला ऑईल व सॉल्वंट सदृष्य साठयाची ३ लोखंडी पिंपात सुमारे ६०० लिटर साठयाची अवैध साठवणुक केल्याचे आढळुन आले. तसेच या व्यतिरीक्त घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्रही लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. पथकास घटनास्थळी विविध टँकरमधुन ऑईल व इतर साठा गैरमार्गाने काढुन

घटनास्थळी असलेले टँकर क्रमांक एमएच-०४-इएल-३१११, एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-सीजी-४३१९, एमएच-४३-यू-४८५८, एमएच-०४-ईबी-५९८८, एमएच-०४-ईबी-५०४८, एमएच-४३-ई-९५९४, एमएच-०६-एसी-१५७४, एमएच-०४-बीयू-६३३४ व एमएच-४६-एफ-३७५३ असे एकूण १० टँकर तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळावरील परिसरात गैरमार्गाने टँकरमधील काढण्यात आलेला लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा व टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ मधील द्रवपदार्थाचा साठा हा जागीच जप्त करुन संबंधिताविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०४/२०१३, ३०/०४/२०१३ व २९/०५/२०१३ रोजी या कार्यालयांत सुनावणी ठेवण्यात आली. तद्नंतर घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या विविध साठयातील घेण्यात आलेल्या नमुन्यांचा पृथःकरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

**युक्तीवाद :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०९/०४/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपींचा, ट्रक चालकांचा तसेच माल धारकांचा तपास चालु असुन गुन्हयाचा तपास प्राथमिक टप्प्यात असल्याने गुन्हयाचा अहवाल सादर करण्याकरीता पुढील तारीख मिळण्याची विनंती केली.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २६/०४/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात, नोटीसमधील प्रतीवादी अनु.क्र. १, २, ३ व २९ यांचा शोध घेतला परंतु ते मिळुन न आल्याने त्यांना नोटीसची बजावणी करता आली नाही. सदर प्रतीवादींचा शोध घेऊन त्यांना नोटीस बजावणी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सदर नोटीस बजावणी झाल्यास त्याबाबत स्वतंत्र अहवाल सादर करण्यात येईल असे नमुद आहे व ३०/०५/२०१३ रोजी प्राप्त अभिवेदनात सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी बाबत तपास करण्यात येत आहे असे नमुद आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणी अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

दिनांक २०/०३/२०१३ रोजी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने सेक्टर १९ अे, गाडी अड्डा, वाशी येथे पंचांसह धाड टाकुन घटनास्थळी १० टँकर तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळावरील परिसरात गैरमार्गाने टँकरमधील काढण्यात आलेला लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा व टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ मधील द्रवपदार्थाचा साठा हा जागीच जप्त करुन संबंधिताविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १५८६/२०१३, १५८७/२०१३ व १८३१/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी, क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३२/२०१३ अन्वये दिनांक ०४/०७/२०१३ रोजी व क्रिमिनल रिट पिटीशन क्र. १८३९/२०१३, १८४०/२०१३ व १८४१/२०१३ अन्वये दिनांक २२/०७/२०१३ रोजी टँकर क्रमांक एमएच-०४-इएल-३१११, एमएच-०४-डीके-७६८९, एमएच-०४-ईबी-५९८८, एमएच-०४-ईबी-५०४८, एमएच-४३-ई-९५९४, एमएच-०६-अेसी-१५७४, एमएच-०४-बीयू-६३३४ व एमएच-४६-एफ-३७५३ असे एकुण ८ टँकर मुक्त करण्याचे आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार वरिष्ठ पोलिस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सुचना यापुर्वीच देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी वरील नमुद ८ टँकर हे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी यापुर्वीच मुक्त करण्याचे आदेश पारीत केले असल्याने सदरचे ८ टँकर वगळता घटनास्थळी जप्त करण्यात आलेले उर्वरीत दोन टँकरबाबत आदेश पारीत करण्याचे प्रस्तावित आहे. सबब, टँकर क्रमांक एमएच-०४-सीजी-४३१९ हा त्यामधील साठयासह व एमएच-४३-यू-४८५८ हे दोन्ही टँकर मुक्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील पथकाने धाड टाकली असता, घटनास्थळावरील परिसरात टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ हे बेवारस स्थितीमध्ये उभे असल्याचे आढळुन आले. पथकाने टेंम्पोची पहाणी केली असता सदर टेंम्पोमध्ये विविध टँकरमधुन गैरमार्गाने काढण्यात आलेला ऑईल व सॉल्वंट सदृष्य साठयाची ३ लोखंडी पिंपात सुमारे ६०० लिटर साठयाची अवैध साठवणुक केल्याचे आढळुन आले. तसेच या व्यतिरीक्त घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्रही लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. पथकास घटनास्थळी विविध टँकरमधुन ऑईल व इतर साठा गैरमार्गाने काढुन

घेण्याचा दाढी यादव, राजबहादुर यादव व प्रकाश दळवी यांचा अवैध व्यवसाय कार्यरत असल्याचे आढळून आले. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांचेवतीने सादर केलेल्या अभिवेदनाचे अवलोकन करता पोलिसांना अद्यापही नमुद तिनही आरोपीतांना अटक करण्यात यश आले नाही ही खेदजनक बाब आहे.

जप्त करण्यात आलेल्या टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ चे मालक यांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. यावरुन जप्त टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ चे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त टेंम्पो परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टेंम्पोच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेंम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेंम्पो त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टेंम्पोचा मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टेंम्पो जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच वरील नमुद टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ च्या व्यतिरीक्त पथकाने घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्रही लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा जप्त केला आहे. तथापी, सदर साठयाच्या मालकीचा आजमितीस कोणीही दावा केला नाही. यावरुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध क्षमतेच्या ड्रम व कॅनमधील साठा हा अनधिकृत अड्यावर येणाऱ्या टॅंकरमधुन गैरमार्गाने काढला असल्याचे सिध्द होत आहे. सबब, घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्र परिसरात जप्त करण्यात आलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी उर्वरीत मुद्देमाला संदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले टॅंकर क्रमांक एमएच-०४-सीजी-४३१९ हा त्यामधील साठयासह व टॅंकर क्रमांक एमएच-४३-यू-४८५८ हे मुक्त करण्यात येत आहे.

घेण्याचा दाढी यादव, राजबहादुर यादव व प्रकाश दळवी यांचा अवैध व्यवसाय कार्यरत असल्याचे आढळून आले. तथापी, तपासी पोलिस अधिकारी यांचेवतीने सादर केलेल्या अभिवेदनाचे अवलोकन करता पोलिसांना अद्यापही नमुद तिनही आरोपीतांना अटक करण्यात यश आले नाही ही खेदजनक बाब आहे.

जप्त करण्यात आलेल्या टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ चे मालक यांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करुनही ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. यावरुन जप्त टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ चे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त टेंम्पो परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टेंम्पोच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टेंम्पोचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेंम्पो त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टेंम्पोचा मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टेंम्पो जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच वरील नमुद टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ च्या व्यतिरीक्त पथकाने घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्रही लोखंडी/प्लॅस्टिक पिंप व कॅनमधील द्रवपदार्थाचा साठा जप्त केला आहे. तथापी, सदर साठयाच्या मालकीचा आजमितीस कोणीही दावा केला नाही. यावरुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला विविध क्षमतेच्या ड्रम व कॅनमधील साठा हा अनधिकृत अड्यावर येणाऱ्या टँकरमधुन गैरमार्गाने काढला असल्याचे सिध्द होते आहे. सबब, घटनास्थळी झाडी झुडपात व इतरत्र परिसरात जप्त करण्यात आलेला संपुर्ण द्रवपदार्थाचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६३/२०१३, दिनांक २२/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालापैकी उर्वरीत मुद्देमाला संदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले टँकर क्रमांक एमएच-०४-सीजी-४३१९ हा त्यामधील साठयासह व टँकर क्रमांक एमएच-४३-यू-४८५८ हे मुक्त करण्यात येत आहे.

0005२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-४३-अेडी-३४७७ हा शासनजमा करण्यात येत आहे.

३) सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा वाहनाचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

४) घटनास्थळी टेंम्पोमधील तसेच झाडी झुडपात व इतरत्र घटनास्थळावरील परीसरात जप्त करण्यात आलेल्या लोखंडी अथवा प्लास्टिक पिंपामधील तसेच कॅनमधील ऑईल व सॉल्वंट सदृष्य द्रवपदार्थाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

५) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) उपरोक्त रिकामे होणारे लोखंडी अथवा प्लास्टिक पिंप, प्लॉस्टिक कॅन, लोखंडी गळती (टब), प्लॉस्टिक पाईप (अंदाजे २ मिटर लांबीचे), रबरी पाईप (अंदाजे ४ मिटर लांबीचे) इ. वस्तुंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही -
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टॅंकर क्र. एमएच ०४ सीजी ४३१९ चा मालक
२) टॅंकर क्र. एमएच ४३ यू ४८५८ चा मालक

0006

३) टेम्पो क्र.एमएच ४३ अेडी ३४७७ चा मालक

४) दाढी यादव

५) राजबहादूर यादव

६) प्रकाश दळवी

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नविन मंत्रालय, ८ वा मजला, जी.टी. हॉस्पीटल कॉम्प्लेक्स इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव

~~४) निवड नस्ती.~~

CONTROLLER OF RATIONING & CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.